| CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | | ISSN- 2319-8648 |
|---|---|---|
| Impact Factor - (SJIF) – 7. 139 Special Issue -28 , Vol. 1 | Jan. 2020 | Peer Reviewerd |

# CURRENT GLOBAL REVIEWER

Impact Factor – 7.139 ISSN – 2319-86948

Multidisciplinary International Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

# Relevance of Mahatma Gandhi in Today's World

**March 2020 Special Issue – 26 Vol. I**

Chief Editor

**Mr. Arun B. Godam**

**Guest Editors**

*Guide*

**Dr. B. G. Gaikwad**

Principal

Shivaji College, Hingoli (MS)

*Editor*

**Dr. Balasaheb S. Kshirsagar**

Director, Gandhian Studies Centre

Shivaji College, Hingoli (MS)

*Co-Editor*

**Dr. Dhale S.U.**

Dept. of Political Science,

Shivaji College, Hingoli (MS)

*Co-Editor*

**Dr. Hurgule N.R.**

Dept. of Sociology,

Shivaji College, Hingoli (MS)

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

**Shaurya Publication, Latur**

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue -28 , Vol. 1 | Jan. 2020 | Peer Reviewerd


32. महात्मा गांधीजीचे आर्थिक विचार 102
प्रा.डॉ.दामाजीवाले एम.डी.

33. आजच्या काळात महात्मा गांधीच्या विचारांची प्रसंगीकता 105
डॉ. संजय गायकवाड

34. **महात्मा गांधी यांचे विधी व्यवसाय विषयक मत** 107
**प्रा.सुवर्णा उमाकांत टेंकाळे**

35. **महात्मा गांधी आणि भारतीय स्वातंत्र चळवळ** 110
डॉ.दताउध्दव जाधव

36. 'म.गांधी यांच्या विचारांचे विविध पैलू' 113
प्रा.डॉ. एस.व्ही.शेट्टे

37. **महात्मा गांधी आणि राष्ट्रीय सेवा योजना** 116
**गणेश वामन पाटील**

38. महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार 120
प्रा. डॉ. मुसळे आर. एस.

39. महात्मा गांधींचे राजकीय विचार : एक अभ्यास 122
डॉ. राम धारासूरकर

40. **महात्मा गांधी यांची विश्वस्त कल्पना : एक अभ्यास** 124
प्रा. डॉ. रामदास डी. मुक्टे

41. **महात्मा गांधीजीचे सत्याग्रह विषयक विचार** 127
**प्रा.ठोंबरे एम. डी.**

42. **महात्मा गांधीजीचे कृतीशील सामाजीक धोरण** 129
प्रा.काळे टी. एफ.

43. " महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार 132
**प्रा .शिवराज पुरुषोत्तम बाजुळगे.**


PRINCIPAL
Shivaji College ...

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28, Vol. 1 March 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# महात्मा गांधी यांची विश्वस्त कल्पना : एक अभ्यास

प्रा. डॉ. रामदास डी. मुकटे
(सहा. प्राध्यापक) शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

---

सारांश

महात्मा गांधी यांच्या विचारांमध्ये विश्वस्त या कल्पनेला अनन्यसाधारण महत्वाचे स्थान आहे. विश्वस्त कल्पना ही देशातील भांडवलशाही अर्थव्यवस्था अहिंसेच्या मार्गाने संपुष्टात आणून आर्थिक समानता निर्माण करण्याचे एक साधन आहे. समाजातील भांडवलदारांनी आपल्याकडे असलेली संपत्ती पैकी स्वतःला आवश्यक आहे तेवढीच संपत्ती स्वतःकडे ठेवून इतर संपत्तीचे विश्वस्त बनण्याचे आवाहन गांधींनी केले आहे. त्यांच्या मते विश्वस्त संकल्पनेचा भांडवलदाराने स्विकार केला तर संपत्तीचा योग्य वापर होईल. त्यातून पृथ्वीतलावरील गरीब-श्रीमंत वर्ग संपुष्टात येवून कामगार-मालक वर्ग संघर्ष दूर होईल. पर्यायाने रक्तमय, हिंसक क्रांती न होता वर्गविरहित समाज निर्माण होऊन सर्वांचा विकास होईल.

संज्ञा

त्रिसुत्री, विश्व, विश्वस्त, उदय, अहिंसा, अस्तेय, ब्रम्हचर्य, असंग्रह, विषमता, संघर्ष, हिंसक, रक्तमय, क्रांती, स्वातंत्र्य, स्वाभाव.

प्रस्तावना

महात्मा गांधी यांना राष्ट्रपिता म्हणून आपण ओळखतो. भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये महत्वपुर्ण योगदान त्यांचे आहे. स्वातंत्र्य, न्याय आणि समता ही त्रिसुत्री विचार महात्मा गांधी यांच्या विचारातून दिसतात. स्वातंत्र्य, समतेचा संदेश संपूर्ण जगाला दिला आहे. समता त्यामध्ये सामाजिक समानते बरोबर आर्थिक समानतेचे विचार महात्मा गांधी यांनी मांडले आहेत. समाजातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या गरजा पूर्ण करता आल्या पाहिजेत, आपला विकास करता आला पाहिजे. त्यासाठी त्याला आवश्यक त्या सोयींच्या उपलब्धतेसाठी समाजातील धनिकांनी समोर येण्याची आवश्यकता महात्मा गांधी यांना अपेक्षित होती. बनारस हिंदू विद्यापीठाच्या उद्घाटनप्रसंगी फेब्रुवारी 1916 मध्ये गांधीजींनी जे भाषण केले, त्यात त्यांनी विश्वस्त योजनेचा प्रथम उल्लेख केला. आपले सहकारी किशोरीलाल मश्रूवाला, नरहरी पारेख प्यारेलाल यांच्याशी विचार विनिमय करून कल्पनेचा 1940 मध्ये एक मसुदा तयार केला.[1] त्यातून विश्वस्त कल्पनेचा उदय झाल्याचा दिसून येतो. 'गितेत सांगितलेल्या सत्य, अहिंसा, अस्तेय, ब्रम्हचर्य, असंगृह्या तत्वापैकी असंगृह्या तत्वाआधारे गांधीजींनी विश्वस्त संकल्पना मांडली.'[2]

उद्दिष्ये–प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टये खालील प्रमाणे आहेत.

1) महात्मा गांधीची विश्वस्त कल्पना स्पष्ट करा.

2) समाजातील आर्थिक विषमता दूर करण्यासाठी विश्वस्त कल्पनेची उपयुक्तता लक्षात घेणे.

गृहिते–

1) विश्वस्त कल्पनेच्या आधारे देशात आर्थिक समानतेची निर्मिती होऊ शकते.

2) विश्वस्त कल्पना म्हणजे अहिंसेच्या मार्गाने भांडवलशाही संपुष्टात आणण्याचे साधन आहे.

विश्वस्त कल्पना–

'सुदैवी आणि कर्तबगार मंडळींनी स्वतःला सन्मानजनीय जीवन जगता येईल एवढी संपत्ती वापरावी उर्वरीत संपत्ती समाजाकरीता वापरावी.'[3]

संशोधनपध्दती –

सदरीलशोधनिबंधामध्येउपलब्धद्वितीयस्त्रोतांच्यातथ्यांच्याआधारावर विश्लेषनात्मकसंशोधनपध्दतीचावापरकरण्यातआलाआहे. अभ्यासासंबंधीत उपलब्ध संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे व साधनांचा उपयोग केला आहे.

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

विश्वस्तकल्पनाविषयकविचार – महात्मा गांधी यांच्या विचारांमध्ये विश्वस्त कल्पनेला अनन्यसाधारण महत्वाचे स्थान आहे. समाजामध्ये सर्वच घटकांत दिसून येणारी विषमता त्यामध्ये विशेषतः आर्थिक विषमता या विषयी महात्मा गांधी यांच्या मनात चिंता

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

हानी, दुःख होते. व्यक्ती वैयक्तिक हितसंबंध जोपासत असतांना व्यक्तींमधे त्यातून विषमता निर्माण होते. अनावश्यक मालमत्तेमुळे तीचा दूरउपयोग होण्याची भिती असते. तेव्हा त्याचा दूरउपयोग होऊ नये ही अपेक्षा महात्मा गांधी याची होती. त्यांच्या मते समाजातील ज्यावर्गाकडे संपत्ती आहे. अशा व्यक्तीला गांधी सुदैवी व्यक्ती म्हणतात. तेव्हा सुदैवी आणि कर्तबगारी मंडळींनी स्वत:ला सन्माननीय जीवन जगता येईल. एवढी संपत्ती स्वत:कडे ठेवावी आणि उर्वरीत संपत्ती समाजाकरीता वापरतात आणावी जेणे करून संपत्तीचा योग्य वापर होईल. 'गांधीजीची विश्वस्त वृत्तीची कल्पनाही आपल्याला प्रत्येक वस्तूईश्वराकडून मिळते व आपल्या जवळची प्रत्येक वस्तू ईश्वराची आहे. म्हणून ती ईश्वराच्या लेकरासाठी (म्हणजेचगोर-गरीबांसाठी) असते. त्यामुळे सर्वशक्तीमान ईश्वर कशाचाही संग्रह करीत नाही. माणसानेही दररोज आपल्याला गरजे प्रमाणे मिळवावे आणि कशाचाही संग्रह करू नये या विचारसरणीवर कल्पना आधारीत आहे.' [4]

समाजातील श्रीमंत व्यक्तीने आपल्या संपत्तीचे मालक न बनता विश्वस्त बनावे. कमवलेली संपत्ती समाजासाठी उपयोगात आणावी. त्यामुळे समाजात समानता निर्माण होईल. त्यातून गरीब-श्रीमंत, कामगार-मालक हा वर्ग संघर्ष टळेल. त्यातून हिंसक वर्ग क्रांती टळू शकेल. आणि राज्याच्या प्रभावी पुढाकाराशिवाय समाज परिवर्तन घडू शकेल. असा विश्वास गांधी यांनी प्रस्तूत कल्पनेच्या आधारे व्यक्त केला. गांधींना अपेक्षीत विश्वस्त कल्पनेतील काही महत्वाचेमुद्दे

1) विश्वस्त कल्पना समतेच्या आधारावर समाज रचना निर्माण करण्याचे साधन आहे.

2) ऐश्वर्यवादी जीवन जगण्यासाठी अभिपेत असेल. तेवढीच संपत्ती स्वत:कडे ठेवून इतर संपत्तीचे विश्वस्त बनावे.

3) [illegible] . ... वादीतेच्या मार्गाने परिवर्तन घडून आणावे.

4) व्यक्तीला स्वत:च्या स्वार्थासाठी आणि समाजविरोधी कार्याकरीता स्वत:च्या संपत्तीचा वापर करता येणार नाही. व मालकीहक्क अनुभवता येणार नाही.

5) कामगाराचे कमाल व किमान वेतन निश्चित करणे आणि किमान आणि कमाल यामध्ये फरक कमीत कमीअसावा.

6) अर्थव्यस्थेत एकूण उत्पादन हे व्यक्तीच्या मनानुसार किंवा नफ्यावर आधारित नसावे तर उत्पादनाची सामाजिक गरज लक्षात घेऊन उत्पादन केले जावे.

अशाप्रकारची प्रमुख तत्वे विश्वस्त कल्पनेची दिसून येतात. 'गांधीजींनी न्यायाने विश्वस्तपणाचे तत्व जगाला आचरणात आणायला सांगण्याआधी आपल्या सर्व मिळकतीचा विश्वस्त निधी दक्षिणआफ्रिकेत असतांनाच केला होता. त्या स्वानुभवाच्या बळावर ते धार्मिक वर्गाला आपल्या पैशाचे समाजासाठी विश्वस्त बनण्याचे आवाहन करीत होते .'[5] ज्यामुळे समाजामध्ये सामाजिक, आर्थिक समानता निर्माण होईल. याचा सतत प्रयत्न महात्मा गांधी यांच्या विचारातून समोर येतो. संपत्तीविषयी असलेले विचार, स्वार्थ पर्यायाने मानवी स्वभाव बदलाच्या प्रयत्न गांधीजींचा आहे.

निष्कर्ष–

महात्मा गांधींयांनी विश्वस्त कल्पनेचा अभ्यास करीत असतांना संशोधन अभ्यासाअंती खालील प्रकाराची निष्कर्ष समोर येतात.

1) भांडवलशाहीला अहिंसेच्या मार्गाने संपुष्टात आणण्याचा मार्ग म्हणजे विश्वस्त कल्पना आहे.

2) विश्वस्त कल्पनेतून स्वत:च्या विकासाबरोबर इतरांच्या विकासाकडे लक्ष दिले पाहिजे. हा विचार समाजा पर्यंत पोहचविला गेला.

3) कामगार-मालक यांच्यातील वर्ग संघर्ष कमी होण्यास मदत होईल.

4) विश्वस्त कल्पनेचा प्रत्येक श्रीमंतानी स्विकार केला. तर समाजामध्ये निश्चितपणे आर्थिक, समाजिक समता निर्माण होण्यास मदत होईल.

गृहितकांची पडताळणी –

प्रस्तुत संशोधन अभ्यासाच्या प्रथम गृहितांची पडताळणी करीत असतांना पहिले गृहित सिद्ध होताना दिसून येते की, गांधीजींच्या विश्वस्त कल्पनेचा भांडवलदारांनी स्विकार केला आणि संपत्तीचे मालक न होता विश्वस्त झाले. तर समाजामध्ये संपत्तीचा उपयोग आणि लाभ संपूर्ण समाजाला होईल त्यातून आर्थिक समानता निर्माण होईल.

दुसऱ्या गृहिताची पडताळणी करतांना विश्वस्त संकल्पनेची अंमलबजावणी ही केवळ अहिंसेच्या मार्गानी करावी. अशाप्रकारचे प्रतिपादन गांधीजींनी केले. त्यामुळे विश्वस्त कल्पनेचा स्विकार म्हणजे भांडवलशाहीचा अंत आहे हे सिद्ध होते.

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

Special Issue 28 , Vol. 1 March 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139


अशाप्रकारे दोन्ही गृहितांची सिध्दता होत असतांना दिसून येते.

थोडक्यात महात्मा गांधीजींची विश्वस्त कल्पना म्हणजे अहिंसात्मक मार्गाने भांडवलशाही समाज बदलण्याचे एक साधन आहे की, ज्यामुळे समाजामध्ये न्याय, समता अस्तित्वात येईल. भांडवलदार संपत्तीचे मालक स्वत:हून विश्वस्त बनल्यामुळे समाजातील गरीब-श्रीमंत, कामगार- मालक अशाप्रकारचे वर्ग संपुष्टात येऊन वर्गविरहित समाज निर्माण होईल. एकप्रकारे प्रभावी समाज परिवर्तन होईल.


संदर्भ -

1) प्रा. कुमानाचे, 2005, 'आर्थिक विचारांचा इतिहास' कैलास पब्लिकेशन्स औरंगपुरा, औरंगाबाद - पृ. क्र. 152.

2) प्रा. डॉ. जाधवर,2015, 'आर्थिकविचारांचाइतिहास' अथर्वप्रकाशन, पुणे - 5 डिसेंबरपृ. क्र. 158.

3) विद्याधर पटवर्धन,1998, 'आर्थिक विचारांचा इतिहास' पिंपळापुरे पब्लीकेशन्स, नागपुर- पृ. क्र. 138.

4) के. एच. ठक्कर,1993, 'अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास' विद्या प्रकाशन, नागपुर - पृ. क्र. 338.

5) किता - पृ. क्र. 338.

6)

इतर संदर्भ-

1) मो.क. गांधी, मार्च 2012, सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथन (अनुवाद - सि.पु. पटवर्धन), नवजीवन प्रकाशन मंदीर, अहमदाबाद-14

2) म.गांधी 2007, माझ्या स्वप्नाचा भारत, परमधाम प्रकाशन, पवनार (वर्धा)

3) हरिभाऊ उपाध्याय, 2004, बापूकथा (1920-1948), सर्व सेवासंघ प्रकाशन राजघाट, वाराणसी-221001

4) एम.के. गांधी, 2004, सत्य के प्रयोग अथवा आत्मकथा, नवजीवन प्रकाशन मंदीर, अहमदाबाद-14